### तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## मराठी विभाग वार्षिक अहवाल २०२०-२०२१

मराठी विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. या वर्षात नियमित अध्यापन कार्यासाठी सत्रानुरूप अभ्यासक्रमाचा नियोजित आराखडा तयार करून त्याची पूर्तता करण्यात आली.

**प्रथम सत्र :** या सत्रामध्ये निर्धारीत वेळेत ऑनलाई पध्दतीने अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

प्रथम सत्रामध्ये पुढील उपक्रम राबवण्यात आले.

**१. परिसंवाद :** विद्यार्थ्यांमधील चिकित्सक दृष्टिकोन व संभाषण कौशल्यात वाढ व्हावी यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

**२. अभ्यासवर्ग :** 'मराठी भाषा वर्णविचार' या विषयावर दिनांक ०७/०६/२०२१ ते १४/०७/२०२१ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सदर अभ्यास वर्गाचे आयोजन केले होते. या अभ्यास वर्गासाठी महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थ्यांचा महाराष्ट्रभरातून सहभाग होता. या अभ्यास वर्गासाठी एकूण १४८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. हा अभ्यासवर्ग डॉ.प्रशांत चौधरी यांनी विशेष परिश्रमातून पूर्ण केला.

३. बी.ए.प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बी.एस्सी. प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते.

### द्वितीय सत्र :

या सत्रामध्ये निर्धारीत वेळेत ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

**१. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या कार्यक्रमाचे उद्घाटन दि.१४ जानेवारी २०२१ रोजी करण्यात आले. या निमित्त प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांनी विषय मांडणी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी मानले.

**२. निबंध स्पर्धा :**

दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी निबंधा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी 'मराठी भाषेचे संवर्धन', 'मराठी भाषा दिवस' आणि 'कविवर्य कुसुमाग्रज' हे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेत प्रज्योती रविंद्र वाघमारे (प्रथम), प्रिती महादेव हुंडेकर (द्वितीय), स्वरांजली गौतम कांबळे (तृतीय) आणि प्रांजली जालिंदर मंगरुळे (उत्तेजनार्थ) असे क्रमांक विद्यार्थ्यांनी प्राप्त केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी आणि डॉ.सहदेव रसाळ यांनी परिश्रम घेतले.

### ३. हस्ताक्षर स्पर्धा :

या हस्ताक्षर स्पर्धेमध्ये एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा दिनांक २१/०१/२०२१ रोजी घेण्यात आली. या हस्ताक्षर स्पर्धेमध्ये साक्षी सतिश भांगे (प्रथम), अंकिता संजय कुलकर्णी (द्वितीय), तबसुम सादिक शेख (तृतीय) या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावले.

### ४. काव्य-चित्र स्पर्धा :-

विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव मिळावा यासाठी दिनांक २५/०१/२०२१ रोजी काव्य-चित्र स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये वेदश्री कुलकर्णी (प्रथम) आणि श्रुती अभय पाटील (द्वितीय) क्रमांक घेऊन यशस्वी झाले. ही स्पर्धा प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांच्या संकल्पनेतून पार पडली.

### ५. भित्तीपत्रक अनावरण :-

दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजी महाविद्यालयाच्या मराठी विभागात भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. हे भित्तीपत्रक कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितांच्या अनुषंगाने करण्यात आले. या भित्तीपत्रकाचे संपादन केदार काळे, प्रीती हुंडेकर, प्रीती रसाळ आणि प्रतिक्षा पवळे या विद्यार्थ्यांनी केले. यासाठी प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी आणि डॉ.सहदेव रसाळ यांनी परिश्रम घेतले.

### ६. विशेष व्याख्यान :-

'मराठी कवितेतील प्रेमछटा' या विषयावर दिनांक २७/०१/२०२१ रोजी प्रा.डॉ.अरविंद हंगरगेकर यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी कवी मधुकर हुजरे यांचे काव्य वाचनही झाले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ.सहदेव रसाळ, प्रा.डॉ.विनोदकुमार वायचळ यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला आभासी पध्दतीने प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रसंगी प्रत्यक्ष आणि आभासी पध्दतीने विद्यार्थी उपस्थित होते.

### ७. राजभाषा मराठी गौरव दिन :-

वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जयंती दिन दिनांक २७ फेब्रुवारी हा राजभाषा मराठी गौरवदिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काही उपक्रमांचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले होते. यासाठी विद्यार्थीही आभासी पध्दतीने उपस्थित होते.


८. बी.ए.प्रथम, द्वितीय, तृतीय व बी.एस्सी प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षामध्ये गरजेनुसार आभासी पध्दतीचाही वापर करण्यात आला.

अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये एूण दोन सत्रामध्ये अभ्यासक्रम व अभ्यासेत्तर अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामधील काही उपक्रम हे आभासी पध्दतीने पूर्ण केले.

# छायाचित्रे




१. मराठी राजभाषा दिनानिमित्त काव्यवाचन करताना विद्यार्थीनी व व्यासपीठावर विराजमान मान्यवर





२. ऑनलाईन पध्दतीने अतिथी व्याख्यान देताना प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख, तुळजापूर.



३. मराठी राजभाषा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना कवी डी.के.शेख, व्यासपीठत्तवर मराठी विभाग प्रमुख तथा प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी




४.कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमानिमित्त प्रतिमापूजन करताना डॉ.अरविंद हंगरगेकर व अन्य मान्यवर.



५. मराठी विभागांतर्गत परिसंवादात कवितेवर मांडणी करताना बी.ए.प्रथम वर्षातील विद्यार्थी सौरभ माळी.

सहाय्यक प्राध्यापक

डॉ.सहदेव रसाळ

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय कार्यालय उस्मानाबाद

प्राचार्य

डॉ.प्रशांत चौधरी

PRINCIPAL
Venkatesh Mahajan Sr.Colleg
Osmanabad